# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**(कुलसचिव यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले**
(एम.एस.सी., पी.एच.डी.)
कुलसचिव

संकेतस्थळ :www.unigug.ac.in
ई.मेल :faogug@gmail.com
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०४


जावक क्रमांक/गो.वि./कु.स.का./२६८०/२०२०

दिनांक : २५/०२/२०२०

## परिपत्रक

संदर्भ-मा.सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्र. उशिनाग/शिष्यवृत्ती/७३५/२०२० दिनांक १०.०२.२०२० अतितात्काळ स्मरणपत्र-१

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्याकरीता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर शिष्यवृत्तीच्या योजनासाठी सन २०१९-२० करीता प्राप्त झालेल्या अर्जाचे प्रमाण हे मागील वर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आले आहे.

करीता विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता, ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अद्यापही शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज भरणेसाठी **दि. २९.०२.२०२० पर्यंत** मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी अंतीम मुदतीची वाट न पाहता शिष्यवृत्तीसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना तात्काळ महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज सादर करण्याबाबत महाविद्यालयात विशेष कार्यशाळा आयोजीत करून शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेबाबत सहाय्य करण्यात यावे.

सदर शिष्यवृत्तीपासून पात्र विद्यार्थी वंचीत राहील्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्य यांची राहील.

कळावे,

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली